REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन ग्रंथालये

**प्रा. केतन रमेश देवरे**
**ग्रंथपाल, म.वि.प्र. समाजाचे , कला व वाणिज्य महाविद्यालय, सोयगांव ,**
**ता. मालेगांव जि. नाशिक.**

## प्रस्तावना :

ग्रंथालये ही शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा अविभाज्य भाग आहेत. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथालये ही शिक्षकांचे आणि भावी शिक्षकांचे बौध्दिक कुतुहल भागविण्याचे काम करतात. ज्यामुळे त्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास होऊन ते विद्यार्थ्यांच्या जाणिवा व क्षमता समजावून घेऊन त्यांना योग्य दिशेने मार्गदर्शन करुन प्रोत्साहित करु शकतात. शिक्षणशास्त्र महाविद्यालये त्यांची उद्दिष्ट्ये ग्रंथालयांशिवाय पूर्ण करु शकत नाहीत. तसेच ग्रंथालयांनाही शिक्षणास मदत करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करावयाचे असते. त्याचबरोबर आपल्या पितृसंस्थेच्या उद्दिष्टयपूर्तीस मदत करण्याबरोबर ग्रंथालयांना वाचकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचे तसेच जोपासण्याचे महत्वाचे कार्य करायचे असते. त्याचबरोबर असे म्हणता येईल की विद्यार्थी-शिक्षक हे जर ग्रंथालयांचा नियमित व योग्य वापर करत असतील तर भावी काळात ते ज्या मुलांना शिकवतील, त्यांच्यामध्ये वाचनाची आवड व गोडी निर्माण करु शकतील. म्हणून शैक्षणिक क्षेत्रामध्ये सुसज्ज व परिपूर्ण ग्रंथालये वाचकांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक ठरतात आणि वाचकांच्या गरजा या नेहमीच वाढत जाणाऱ्या व ग्रंथालयांवर सतत दबाव टाकणाऱ्या असतात. तेव्हा या साऱ्याचा परिणाम म्हणजे ग्रंथालयांचे कामकाज आताच्या काळात आव्हानात्मक कार्य झाले आहे. म्हणून आताच्या काळात ही ग्रंथालये त्यांची उद्दिष्टे पूर्ण करतात की नाही याचा शोध घेणे आवश्यक ठरते.

ग्रंथालयाचे महत्वाचे उद्दिष्टय हेच आहे की, वाचकाची गरज भागविण्यासाठी योग्य ती माहिती, योग्य त्या वेळेला, योग्य त्या वाचकाला वितरित करणे होय. डॉ. झाकीर हुसेन म्हणतात की, ''एखादी शैक्षणिक संस्था किंवा महाविद्यालय कशा प्रकारे कार्य करते याचे कमी वेळात मूल्यमापन करायचे असल्यास तेथील ग्रंथालयास भेट द्या. थोडक्यात महाविद्यालयाचा आरसा ग्रंथालय असते.'' महाविद्यालयातील उच्चशिक्षणाचे स्थान, शिक्षणाचे महत्त्व, उद्दिष्टये, आधुनिक शिक्षण, त्यासाठी वापरलेले तंत्रज्ञान, संगणक, इंटरनेट, डिजिटायझेशन यामुळे ग्रंथालयाचे स्वरुप बदलत आहे. देशातील हुशार व गुणवत्तापूर्ण शिक्षक तयार करण्याचे काम शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालये करतात. नॅकसारख्या संस्थेकडून पाहणी करतानाही यातील ग्रंथालयास महत्त्व दिलेले आढळते. कमीत कमी वेळेत योग्य ते वाचन साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी ज्ञान साधनांचा वाढलेला आवाका, त्यांची प्रचंड उपलब्धता, माहितीतील वाढ, ग्रंथालयांच्या आर्थिक समस्या अशा घटकांचा विचार करता ग्रंथालयांचा वापर, उपयोग इ. सर्व दृष्टीने सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. जेणेकरुन त्यांना असणाऱ्या समस्यांवर उपाय शोधता येईल.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालये - ''विशेष ग्रंथालये'' : -



विकीपिडीयानुसार विशिष्ट विषयावरील ग्रंथालयांना विशेष ग्रंथालये म्हणतात. शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालये ही जरी शैक्षणिक ग्रंथालये या सदरात मोडत असली तरी त्यांच्याकरीता विशेष ग्रंथालयांचे निकषही लागू होतात.

''विशेष ग्रंथालयांमध्ये विशिष्ट विषयावरील वाङमय विपुल प्रमाणात असल्यामुळे विशिष्ट प्रकारचे साहित्य विशेष सेवा त्या विषयाच्या अभ्यासकांना त्याचा उपयोग करता येतो. बहुतेक सर्व विशेष ग्रंथालये एखाद्या मोठ्या कारखान्याला, उद्योग प्रकल्पाला, संशोधन प्रयोग शाळेला किंवा संबंधित संस्थेशी संलग्न असून तेथील वाचकांच्या माहिती विषयक गरजा भागविण्याची जबाबदारी या ग्रंथालयाची असते.''(1) (देशपांडे ए.व्ही., पृ.क्र. 54, 2004, ग्रंथालयाचे प्रकार व

त्यांची कार्ये, य.च.म.मु.वि. प्रकाशन, नाशिक) शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालये ही आपल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या पितृसंस्थेशी संलग्न असून भावी शिक्षकांच्या माहितीविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी शिक्षणशास्त्र व त्या संबंधित विशिष्ट वाचनसाहित्य संग्रहीत करुन सेवा देत असतात. शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयाचा वाचकवर्ग व संग्रह हा विशेष ग्रंथालयाच्या वाचकवर्ग व संग्रहाप्रमाणे असून तो साधारण ग्रंथालयापेक्षा भिन्न असतो.

महाविद्यालयीन ग्रंथालये व शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन ग्रंथालये यातील फरक पुढील तक्त्याद्वारे अधिक स्पष्ट करता येईल.

| महाविद्यालय ग्रंथालये | शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालये |
|---|---|
| 1) महाविद्यालयातील ग्रंथालयेही कोणत्याही शाखेचे शैक्षणिक शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच त्यांचे अध्यापक यांना ग्रंथालय सेवा पुरवितात. | 1) शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालये ही शिक्षक प्रशिक्षणातील पदवी घेणारे विद्यार्थी-शिक्षक तसेच त्यांचे प्राध्यापक यांना त्यांच्या गरजेनुसार ग्रंथालयीन सेवा देतात. |
| 2) महाविद्यालय ग्रंथालयातून मुख्यत: क्रमिक पुस्ताकांच्या संग्रहाचा विकास केला जातो. | 2) शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांना ग्रंथा बरोबरच ग्रंथेत्तर वाचन साहित्य तसेच अध्यापन साधने यांचाही प्रामुख्याने विकास करावा लागतो. |
| 3) महाविद्यालयीन ग्रंथालयातून मुख्यत: वाचनसाहित्य देवघेव, संदर्भसेवा, वाचक शिक्षण या सेवा दिल्या जातात. | 3) शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयातून देवघेव संदर्भसेवा, याबरोबर भाषांतर, प्रतिलिपी, आंतरग्रंथालयीन देव-घेव याही सेवांचा प्रामुख्याने समावेश होतो. |
| 4) महाविद्यालयीन ग्रंथालयातून ग्रंथालय वापराबाबत सूचना देताना वाचक प्रशिक्षण दिले जाते. | 4) शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयातून वाचक प्रशिक्षणाबरोबरच उपलब्ध अध्यापन साधने, माहिती साधने, ग्रंथेत्तर साहित्य याबाबत जागरुकता निर्माण करुन उपयुक्तता समजावून सांगितली जाते. |
| 5) महाविद्यालयीन ग्रंथालये विद्यार्थ्यांना वाचनासाठी साहित्य ठरवून मातृसंस्थेच्या उद्दिष्टांना मदत करतात. | 5) शिक्षणशास्त्र महाविद्यालय व ग्रंथालयेही विद्यार्थी-शिक्षकांना अध्ययन व अध्यापनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सेवा व सुविधा देऊन मातृसंस्थेस मदत करतात. |

**वैशिष्टिये :**

1) विशेष ग्रंथालयांप्रमाणेच शिक्षणशास्त्र ग्रंथालये ही विशिष्ट विषयांच्या वा विषय समुहाच्या साहित्याशी संबंधित असतात.
2) एकाच ध्येयपूर्तीकरीता एकत्रित आलेल्या व्यक्तिंच्या गरजेकडे किंवा अशा प्रकारच्या वाचक वर्गाच्या तांत्रिक माहितीविषयक गरजांकडे लक्ष पुरविण्याचे विशेष ग्रंथालयांचे वैशिष्ट्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयानाही लागू होते.
3) शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांचा साहित्य संग्रह हा विशिष्ट प्रकारचा असतो.
4) विशेष ग्रंथालयांप्रमाणे शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालये ही मुळ संस्थेला सहाय्यक असतात.
5) शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालय ही विशेष ग्रंथालयांप्रमाणे आकाराने लहान असून या ग्रंथालयात मर्यादित विषयांचा मर्यादित संग्रह, कर्मचारी व वाचक देखील मर्यादित असतात.
6) शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांचे संपूर्ण कार्य मुळ पालक संस्थेच्या गरजांवर आधारित असते. त्यामुळे तेथील ग्रंथपाल पालक संस्थेचा एक क्रियाशील सभासद असतो.

**उत्कृष्ट ग्रंथालय : अडचणी निवारण :**

सध्याच्या काळात शिक्षण व्यवस्था ही मोठ्या परिवर्तनातून जात आहे आणि सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत निरंतर शिक्षणाला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. शिक्षकांकडून फक्त शिकवणे एवढेच अपेक्षित नसून त्यांनी विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी प्रोत्साहित करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात पुढाकार घेणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर सध्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विद्यार्थी -शिक्षकांना प्रशिक्षण देतांना त्यानुसार अभ्यासक्रम राबविला जातो. या बदलत्या अभ्यासक्रमास व शिक्षणपध्दतीस पुरक असे कार्य तेथील ग्रंथालयांकडून होणे अपेक्षित आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयातील वाचन साहित्य, ग्रंथेतर साहित्य, भौतिक सेवासुविधा, अंदाजपत्रक, वाचकवर्ग, नियतकालिके, अभ्यासिका तसेच संगणकीकरण या सर्व विभागांचा सखोल अभ्यास करुन सद्यस्थितीतील या ग्रंथालयांची उपयुक्तता अभ्यासून बदलत्या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन उत्कृष्ट ग्रंथालय कसे असावे याचा विचार करणे आावश्यक आहे.

शिक्षण पध्दतीचे यश हे शिक्षकाचे कौशल्य आणि क्षमता यावर अवलंबून असते. उत्तम शिक्षक हे देशाचे भविष्य घडवू शकतात हे सर्व मान्य आहे. शिक्षक प्रशिक्षणाचे महत्व ओळखून शिक्षण कमिशन (1966) मध्ये म्हटले आहे की, Investment in teacher education can yield very much because the financial resources required

are small when measured against the resulting improvements in education of millions. (Kothari D.S., 1964-66)

शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालये ही आपल्या महाविद्यालयाची उद्दिष्टे, तसेच शिक्षक व भावी शिक्षकांची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी नेहमीच मदत करत असतात. म्हणून अशा ग्रंथालयांची बलस्थाने तसेच त्यांच्यातील उणीवा यांचा अभ्यास हे भविष्यातील सुधारणा, नियोजन करण्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरणार आहे.

प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रशिक्षण हा महत्त्वाचा भाग असतो. कार्यपध्दतीत सुधारणा करण्यासाठी व्यावसायिक, सामाजिक तसेच शासकीय मनुष्यबळ विकासासाठी त्यांच्या नियोजनाचाच एक भाग म्हणून प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली जाते. प्रशिक्षणाचा मुळ उद्देश हा ज्ञान वाढविणे, कौशल्यांच्या विकास तसेच संबंधित व्यक्तीला त्याचे काम जास्त प्रशिक्षण संस्थामधील ग्रंथालयांच्या सहाय्याने पूर्ण करता येते. शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन ग्रंथालये शिक्षणास पोषक अशा वातावरणाची निर्मिती करण्याबरोबर प्रशिक्षणाच्या अनुषंगाने अधिक माहिती, संशोधनपर लेख इ. प्रशिक्षणार्थी विद्यार्थी शिक्षकांना पुरवण्याचे काम करतात.

नवीन पिढीतील विद्यार्थी-शिक्षकांच्या ग्रंथालयांकडून वाढत्या अपेक्षा आहेत. नवीन प्रशिक्षणार्थी हे उच्चशिक्षित तसेच नवीन तंत्रज्ञानाच्या युगातील असल्याने त्यांना त्यांच्या विषयसंबंधी सुधारित माहिती, संदर्भ, स्वत: ला अद्ययावत ठेवण्यासाठी ग्रंथालयांकडून नेहमीच हवे असतात. ग्रंथपालांनाही आपले कामाचे पारंपारिक स्वरुप बदलून विद्यार्थ्यांच्या अपेक्षांना खरे उतरणारे असे सुधारित व आधुनिक स्वरुपात काम करणे आवश्यक आहे. वाचकांच्या अपेक्षा या नेहमीच बोलून दाखविल्या जात नसल्या, तरी त्या ओळखता येऊन ग्रंथालय संग्रहामध्ये, सेवांमध्ये विकास करणे गरजेचे ठरते. त्या अनुषंगाने ग्रंथालयांची बदलती भूमिका महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणे नवीन शिक्षणपध्दती व तंत्रज्ञानाला सामोरे जाताना ग्रंथालयांमध्ये काय बदल होणे अपेक्षित आहे हे अभ्यासण्याची आवश्यकता आहे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालये, त्यांचे ग्रंथालय, त्यातील वापर व व्यवस्थापन याविषयी सारात्मक माहिती मिळवून त्यादृष्टीने ते ग्रंथालय उत्कृष्ट करण्याचे प्रयत्न झाले पाहिजे. त्या अनुषंगाने शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन ग्रंथालयांचे विविध पैलू ज्यामध्ये ग्रंथालयाचे कामकाज, अर्थव्यवस्था, वाचनसाहित्य संग्रह, मनुष्यबळ, सेवा-सुविधा, वाचकांकडून होणारा वापर, तेथील वाचकांच्या माहितीविषयक गरजा त्यांचे समाधान या अनुषंगाने अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यादृष्टिने खालील मुद्यांनुसार अभ्यास करणे अपेक्षित आहे.

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथालये.
2. शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयातील सेवा
3. शिक्षणशास्त्र महाविद्यालययीन ग्रंथालयांचे आर्थिक व्यवस्थापन.
4. शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन ग्रंथालयांचे मनुष्यबळ व्यवस्थापन.
5. महाविद्यालयातील ग्रंथालय समिती
6. महाविद्यालयातील वाचनसाहित्य संग्रह विकास.
7. महाविद्यालयातील ग्रंथालयांचा वापर व वाचक-अभ्यास.

शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालये विशेष ग्रंथालयांप्रमाणेच कार्य करतात. वरील मुद्यांचा विचार करुन शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांच्या अडचणी-समस्यांचे निराकरण करुन ती आदर्श-उत्कृष्ट बनविण्याचे दृष्टिने प्रयत्न झाले पाहिजेत.

## संदर्भ सूची :

1) देशपांडे ए.व्ही., (2004), ग्रंथालयाचे प्रकार व त्यांची कार्ये, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, प्रकाशन, पृ. क्र. 54.

2) पवार अनिल भानुदास (2006), पुणे विद्यापीठाशी संबंधित असणाऱ्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, एम.फिल. प्रबंध.

3) खेडेकर गुलाब (1989), A servey of collection and services given by Library of College of Education affiliated Poona University पुणे विद्यापीठांतर्गत सादर केलेला एम.फिल. प्रकल्प.

4) भोसले उषा (2003) पुण्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांची पाहणी, पुणे विद्यापीठांतर्गत एम.लिब. करिता सादर संशोधन अहवाल.

5) Singh, Nirmal (2011), A study of the use of libraries of colleges of education in Punjab, Ph.D. desseration - Punjab University. Source - Shodhganga. (htpp://hdd.handle.net/10603/2068).